आयसीटी योजना (तिसरा टप्पा) अंमलबजावणी संदर्भात आय.एल.अँङ.एफ्.एस्. एज्युकेशन टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लि. या संस्थेस Performance Based Payment निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः आयसीटी २०१४/प्र.क्र.२५ भाग-१/एस.डी-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई
दिनांक: १४ नोव्हेंबर, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. २५/०३/२०१३
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि.०७/११/२०१३
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र. २५/एस.डी.१, दि.२६.०३.२०१४
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र. २५/एस.डी.१, दि.२८.०५.२०१४
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५(२)/एस.डी.१, दि.३०/०७/२०१४
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१,दि.०५/०२/२०१५
७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१,दि.०५/०३/२०१५
८) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. ११/९/२०१५
९) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : आयसीटी २०१५/प्र.क्र.१२५/एसडी.१, दि.२१/९/२०१५
१०) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१,दि.१५/०१/२०१६
११) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. ३०/०३/२०१६
१२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. ०८/०६/२०१६
१३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. २०/१०/२०१६
१४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. २७/१०/२०१६
१५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. १७/०१/२०१७
१६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. १६/०३/२०१७
१७) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८/०४/२०१७
१८) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. ३१/०८/२०१७
१९) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. २६/०९/२०१७
२०) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(२)/एस.डी.१, दि. २६/०९/२०१७
२१) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांचे पत्र क्र.रामाशिअ/ICT@school/PhaseIII/PBP२०१६-१७/२०१७-१८/(३८/१७/१४२२, दिनांक ०९/११/२०१७

प्रस्तावना -

राज्यात केंद्र पुरस्कृत माहिती तंत्रज्ञान व दळणवळण (Information & Communication Technology) योजनेचा तिसरा टप्पा ५००० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबविण्यास शासनाच्या संदर्भाधिन दि.२५/०३/२०१३ आणि दि.०७/११/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजना BOOT तत्वावर राबविण्यात येत असून यासाठी निविदा प्रक्रियेव्दारे ५ वर्षासाठी BOOT तत्वावर प्रतिशाळा रुपये

१७.९० लक्ष एवढया दराने योजना राबविण्यासाठी दोन ऑपरेटर्सची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या योजनेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या दोन ऑपरेटर्सपैकी आय.एल.अँड.एफ्.एस्. एज्युकेशन टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लि. या संस्थेस दि. २५/०३/२०१३ च्या शासन निर्णयान्वये २५६० शाळा आणि दि.०७/११/२०१३ च्या शासन निर्णयान्वये १५९० शाळा मंजूर करण्यात आलेल्या आहेत. या ऑपरेटरला मंजूर ४१५० शाळांपैकी ३७८० शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. सदर ३७८० शाळांपैकी दंडात्मक रक्कम आकारण्यात आलेल्या २१५ शाळा, इयत्ता १० वी वर्ग नसलेली १ शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्ग बंद झालेल्या ३ शाळा, इयत्ता १० वी निकालात आढळून न आलेली १ शाळा अशा एकूण २२० शाळांची प्रतिशाळा रक्कम वजा करुन सन २०१६-१७ या कालावधीकरिता Performance Based Payment (PBP) रु.२५,४८,९६,०००/- निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानामार्फत दि.०९/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाने मागणी केलेल्या निधीपैकी रुपये २४६०.४६ लक्ष निधी सद्य:स्थितीत उपलब्ध असून सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u> -

आय.एल.अँड.एफ्.एस्. एज्युकेशन टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लि. या संस्थेला ३७८० शाळांपैकी दंडात्मक रक्कम आकारण्यात आलेल्या २१५ शाळा, इयत्ता १० वी वर्ग नसलेली १ शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्ग बंद झालेल्या ३ शाळा, इयत्ता १० वी निकालात आढळून न आलेली १ शाळा अशा एकूण २२० शाळांची प्रतिशाळा रक्कम वजा करुन सन २०१६-१७ या कालावधीकरिता Performance Based Payment (PBP) साठी रुपये २४,६०,४६,०००/- (रुपये चोवीस कोटी साठ लाख शेहेचाळीस हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास सदर शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षाकरिता "मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (००) (०७) शाळांमध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान योजना कार्यान्वित करणे (केंद्र हिस्सा) (२२०२ ३७९१) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षातंर्गत रु.१००००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. या लेखाशिर्षांतर्गत सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध तरतूदीमधून रुपये १३,७२,०७,०००/- (रुपये तेरा कोटी बहात्तर लाख सात हजार फक्त) इतका खर्च भागविण्यात यावा.

३. तसेच सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षाकरिता "मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (००) (०६) शाळांमध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान योजना कार्यान्वित करणे (राज्य हिस्सा) (२२०२ ३४२१) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षांतर्गत रुपये ४५००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. या लेखाशिर्षांतर्गत सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध तरतूदीमधून रु.१०,८८,३९,०००/- (रुपये दहा कोटी अठ्ठयाऐंशी लाख एकोणचाळीस हजार फक्त) इतका खर्च भागविण्यात यावा.

४. सदर आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८/०४/२०१७ रोजीच्या परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद अनुक्रमांक ७ ते १८ मधील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील १, २, ३,५, ६ व ७ मधील बाबी या आदेशासाठी लागू नाहीत. परिशिष्टातील मुद्दा क्र. ४ नुसार केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाला असल्याचे अभिप्राय वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.३९७/अर्थोपाय, दि.१३/०९/२०१७ अन्वये दिलेले आहेत.

५. सदर खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८/०४/२०१७ च्या परिपत्रकातील सूचना नुसार करण्यात यावा. यासाठी अवर सचिव / कक्ष अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी व सह सचिव (प्रशासन) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११४१६१२३६३८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c818668168cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2017.11.14 16:15:26 +05'30'

(डॉ.सुवर्णा खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
३) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
६) राज्य प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, चर्नीरोड, मुंबई
७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र½, मुंबई, नागपूर
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र½, मुंबई / नागपूर
९) सह सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-६३
११) अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२) सर्व वरिष्ठ लेखापरीक्षक (शिक्षण विभाग)
१३) अवर सचिव (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) वित्त विभाग (व्यय-५)/नियोजन विभाग
१५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अर्थसंकल्प कार्यासन
१६) निवड नस्ती, एसडी-१